'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 115 (B)- भारत : काल आज आणि उद्या
UGC Approved Journal

ISSN : 2348-7143
February-2019

# नविन आर्थिक सुधारणांचा भारताच्या कृषि निर्यातीवरील परिणाम

श्रीमती स्वप्नाली रमेश खांडरे
संशोधक विद्यार्थी
(एस.एम.बी.टी. महाविद्यालय, संगमनेर)

डॉ. भोसले आर.डी.
मार्गदर्शक
(आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज, मनमाड)

**प्रस्तावना :-**

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. कृषी हा भारतीयांचा सर्वात पुरातन असा व्यवसाय असून अर्थव्यवस्थेचा कणा आहे. राष्ट्रीय उत्पन्नात अद्यापही बराच मोठा भाग शेती क्षेत्रातून प्राप्त होतो. त्यामुळे भारताच्या आर्थिक विकासात शेती क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व आहे. १९५० च्या दशकात कृषी क्षेत्राचा एकूण देशांतर्गत उत्पादनातील वाटा ५० टक्क्यांच्या आसपास होता. तो २० व्या शतकाच्या शेवटी २५ टक्क्यांपर्यंत घटलेला आहे. २००८-०९ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार २००३-०४ मध्ये कृषीचा सकल देशांतर्गत उत्पादनातील वाटा २१.७ टक्क्यांवरुन २००७-०८ मध्ये १७.८ टक्क्यांपर्यंत कमी झालेला आहे. इतर देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा विचारात घेता आपल्या देशात राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा अद्यापही बराच मोठा आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६५ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कृषीवर अवलंबून आहे. औद्योगिक विकासाच्या दृष्टीने कृषीला महत्वाचे स्थान आहे. म्हणूनच जोपर्यंत कृषीचा विकास होत नाही तोपर्यंत देशाचा विकास होणे शक्य नाही.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-**

१. कृषी क्षेत्राची भारताच्या आर्थिक विकास आणि विदेशी व्यापारातील भूमिका स्पष्ट करणे.
२. विदेशी व्यापारातील कृषी निर्यातीचे महत्व अभ्यासणे.
३. नविन आर्थिक सुधारणांचा अभ्यास करणे.
४. नविन आर्थिक सुधारणा कार्यक्रम व जागतिक व्यापार संघटनेचा भारताच्या कृषी निर्यातीवर झालेला परिणाम अभ्यासणे.

**विदेशी व्यापार आणि कृषी निर्यात :-**

भारताचा विदेशी व्यापार हा बहुतांशी कृषीशी निगडीत आहे. भारतात कृषी उत्पादनाबाबत सधनता असल्याने भारतातून मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची निर्यात केली जाते. दुर्मिळ असे परकीय चलन मिळवून चहा, कॉफी, साखर, कापूस, ताग, तंबाखू, चमडे, फळे व भाजीपाला आणि अन्नधान्य इत्यादींची निर्यात करुन मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवले जाते. त्याचा उपयोग आर्थिक विकासासाठी आवश्यक कच्चा माल व यंत्रसामग्री यांची आयात करण्यासाठी केला जातो. भारताच्या एकूण निर्यातीत कृषी निर्यातीचा सहभाग महत्वपूर्ण मानला जातो. १९५० च्या दशकात ५० टक्के निर्यात ही कृषी क्षेत्रातून होत असे. २००८-०९ मध्ये हा वाटा ९.१ टक्क्यांपर्यंत कमी झाला असला तरी अद्यापही बहुतांशी निर्यात ही कृषी व संलग्न वस्तूंची केली जाते. म्हणून विदेशी व्यापारात कृषी निर्यातीला अनन्यसाधारण महत्व आहे.

**नविन आर्थिक सुधारणा व कृषी निर्यातीचा कल :-**

१९९० च्या दरम्यान उद्भवलेल्या आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी सरकारने जुलै १९९१ मध्ये "नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा" स्वीकार केला. या कार्यक्रमालाच नवीन आर्थिक धोरण (NEP) असे म्हणतात. खाजगीकरण, जागतिकीकरण व उदारीकरण हे या धोरणाचे आधारस्तंभ होते. आर्थिक स्थैर्य व संरचनात्मक समायोजन